IMPACT FACTOR : 4.197 (IIJIF)

ISSN: 2454-5503

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A Peer Reviewed Bimonthly International Journal

VOL. 6 | ISSUE 4 | AUGUST 2020

## अण्णा भाऊ साठे जन्मशताब्दी विशेषांक



*Guest Editors*

**Dr Raju Badure | Prof. Asha Giri**

*Editor in Chief*

**Dr Kalyan Gangarde**

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

ADARSH VIDYA PRASARAK EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

## अनुक्रमणिका


१. मराठी साहित्यातील शिरोमणी : अण्णा भाऊ साठे | डॉ. संतोष हेंकारे |०७

२. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील तत्वज्ञान | डॉ. विठ्ठल घंटे |१३

३. अण्णा भाऊ साठेंच्या साहित्यातील मानवतावादी विचारदर्शन | डॉ. विठ्ठल जंबाले |२१

४. आंबेडकरवादी साहित्यिक अण्णाभाऊ साठे | डॉ. कीर्तीकुमार मोरे |२७

५. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील आंबेडकरी विचाराचा प्रभाव | डॉ.कहाळेकर सी.एम./ डॉ.अडकीने एस.बी. |३३

६. साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या वाङ्मयातील आंबेडकरवाद | प्रकाश उ. हनवते |४२

७. अण्णा भाऊ साठेंचे मराठी साहित्यातील योगदान |डॉ. बडुरे राजू सा.|४७

८. अण्णा भाऊ साठेंचा वाङ्मयीन दृष्टिकोन | भोपे प्रल्हाद द. |५४

९. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील आशय विविधता | डॉ. ज्ञानेश्वर खिल्लारी | ५८

१०. अण्णा भाऊ साठे : मराठी साहित्यातील अव्दितीय साहित्यिक | डॉ. रवींद्र वै. बेम्बरे | ६१

११. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील मुल्यदर्शन| डॉ.मनोहर सिरसाट |६७

१२. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे : एक संघर्षशील व्यक्तिमत्व | संतोष बा. गालफाडे |७१

१३. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील समाजवास्तव आणि सामाजिक मूल्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास | डॉ. एस. के. राठोड |७५

१४. अण्णाभाऊ साठे आणि सामाजिक परिवर्तन एक समाजशास्त्रीय अभ्यास | डॉ. विश्वनाथ मा.सुर्यवंशी | ८२

१५. अण्णाभाऊ साठे यांचे सामाजिक, आर्थिक व राजकीय विचार | डॉ.आर.के. काळे |८८

१६. साहित्य शिरोमणी अण्णा भाऊ साठेंच्या वाङ्मयातील सामाजिक परिवर्तनवादी विचार | सिध्दार्थ कुं. इंगोले |९५

१७. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याची लेखनशैली | संतोष र.कांबळे |१००

१८. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील ग्रामीण जीवन | डॉ.एम.एफ.राऊतराहे |१०४

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

3.

# अण्णा भाऊ साठेंच्या साहित्यामधील साम्यवादी विचारप्रर्वतन

**प्रा डॉ विठ्ठल जंबाले**
देगलूर महाविद्यालय देगलूर
भ्रमणभाष– ९४२२८७९६०९

**प्रस्तावना** – साम्यवादी विचारांचे प्रवर्तक, लोककलावंत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आणि कार्याचा प्रचार व प्रसार करण्यासाठी 'जग बदल घालुनि घाव, मला सांगुनी गेले भीमराव' याप्रमाणेच आयुष्यभर झागडणारे एक सृजनशील लेखक, क्रांतीची सचेतन पेरणी करणारे अष्टपैलू कलावंत, प्रतिभावंत साहित्यिक असे आगळे बहुआयामी व्यक्तिमत्व लाभलेले अण्णा भाऊ साठे यांचे कार्य चिरंतन ठरले आहे. त्यामध्ये साहित्यसम्राट म्हणून त्यांच्या लेखनातील साम्यवादी विचारांच्या प्रभावांचा मागोवा घेणे औचित्यपूर्ण वाटते. त्याकरिता त्यांचे कथा आणि कादंबरी लेखन आधारभूत मानले आहे. अण्णा भाऊंनी कलावंत म्हणून केलेले कार्य अद्वितीय आहे. शोषित, पीडित, वंचित, उपेक्षित, दुर्लक्षित, अन्यायग्रस्त, अभावग्रस्त माणसाच्या जगण्याला वाचा फोडणारे आहे. त्यांनी साहित्यामधून सामान्य– अतिसामान्य माणसांचे जगणे सक्षमपणे उभे केलेले आहे. शोषित – पीडित माणसांना नीतिमान बनवून चारित्र्यसंपन्न व्यक्तिमत्वाचा आदर्श निर्माण करणारे नायक– नायिका त्यांच्या कथा – कादंबरीचे आकर्षण बनले. अण्णा भाऊंच्या लेखणीमधून ठिकठिकाणी समानता, साम्यवाद, समाजवाद या विचारांची पेरणी झालेली आहे. इंग्रजी अमदानीच्या काळातील भारतीय प्रशासन प्रणाली आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडातील भारतीय प्रशासन व्यवस्था या दोहोंना जोडणारा दुवा म्हणून सामाजिक आणि क्षेत्रातील अण्णाभाऊंचे योगदान आगळेवेगळे आहे. १ ऑगस्ट,१९२० रोजी टिळकांचा देहांत झाला. भारतीय राजकारणातील जहाल मतवादी युगाचा अंत झाला आणि त्याच दिवशी म. गांधीचा भारतीय राजकारणात प्रवेश झाल्यामुळे गांधीपर्वाचा आरंभ झाला. भारतीय राजकारणामधून जहालमतवादी विचारधारेचे लो. टिळकांचे नेतृत्व निखळले आणि स्वातंत्र्य चळवळीतील मवाळ व अहिंसात्मक धोरण अवलंब करणारे म. गांधीजींचे नेतृत्व उदयास आले. त्या विचारसरणीमधून स्वातंत्र्य चळवळ गतिमान बनली. या जोडसांध्यावर अण्णा भाऊंचा जन्म झाला. ज्या दिवशी टिळक निर्वतले, त्याच दिवशी अण्णाभाऊंचा जन्म झाल्याची माहिती त्यांच्या आईकडून त्यांना कळली. नंतरच्या काळात जन्मापासूनच तमाशा कलावंतांच्या कौटुंबिक परंपरेत वाढलेले उपजत प्रतिभावंत अण्णा भाऊ साठे यांनी कला, संस्कृती आणि साहित्य यांचा आविष्कार संपन्नतेने

. त्यांच्या जगण्यासोबतच तमाशातील वग, बतावणी, दासप्रथा या वांचा कलात्मक अविष्कार साहित्यामधून सहजता घडू लागला.

**जडणघडण –**

सातारा जिल्ह्यातील खेडयात वाटेगाव येथे त्यांचा जन्म. औपचारिक शालेय शिक्षणातून दीड दिवसात कायमची मुक्तता करून ते मुंबईत येथे महानगरीय जीवन जगण्यासाठी दाखल झाले. यात त्यांनी महानगरीय माणसांच्या विद्यापीठात अनुभवांच्या अनेक पदव्या संपादन केल्या. त्यांना मुंबईतील वास्तव्यामध्ये जगातील तत्त्वज्ञानांचा परिचय झाला. मॅक्झिम गॉर्की यांच्या साहित्याच्या वाचनातून अण्णा भाऊंची वैचारिक जडणघडण झाली. त्यामुळे जगातील कामगारांनी भांडवलदारांना विरोध केला पाहिजे, अशी त्यांची धारणा बनली. कामगारवर्गाने एकत्र येऊन भांडवलशाहीला विरोध केला पाहिजे आणि भांडवलदारांच्या शोषण परंपरेचे उच्चाटन करण्याकरिता सामूहिक लढा दिला पाहिजे, भूमिकेतून त्यांच्यात साम्यवादी विचारांचा अंतर्भाव होण्यासाठी लेखनसंहिता तयार केली. परिणामतः अण्णा भाऊंच्या चिंतन– मननाचा परिपाक होऊन लेखनातील आशय .आणि विषयाचा ते भाग बनले. त्यांचे लेखन साम्यवादी विचारधारेच्या मुसीतून प्रसूत होऊ लागले. जगाला साम्यवादी विचारांची देणगी ज्यांनी दिली त्या कार्ल मार्क्स यांच्या 'दासकॅपिटल' या ग्रंथातील 'जगातील कामगारांनो एकत्र या आणि भांडवलशाही विरोधी लढा द्या' या संदेशामुळे अण्णा भाऊ प्रभावित झाले, यामुळे त्यांच्यात साम्यवादी मूल्यांची रूजवण झाली. त्यांनी या ग्रंथातील तत्त्वज्ञानाचे विश्लेषण आणि अवलोकन उत्कृष्ट पद्धतीने करून त्या विचारधारेला वाहिलेली लेखनसंपदा निर्माण केली. साम्यवादी क्रांतीचे तत्त्वज्ञान त्यांच्या लेखनाचा स्त्रोत आहे. समाजवादी मूल्यांचा प्रसार हे त्यांच्या लेखनाचे सूत्र बनले. विश्वव्यापी मानवी मूल्यांची प्रस्थापना हे अण्णाभाऊंचे लेखनाचे प्रधान उद्दिष्ट दिसते. समता, धर्मनिरपेक्षता, सहिष्णुता, नीती ही मूल्ये त्यांच्या लेखनाचे आत्मतत्त्व आहे.

**लेखनातील प्रयोगशीलता** – अण्णा भाऊंनी कथेचा आकार, प्रकार आणि रचना यांचे पारंपरिक दंडक व पठडी तोडून – मोडून कथेचे नवे तंत्र व कलात्मक प्रयोग करण्यासाठी आपले कथा विकसन केले. तिच्यामध्ये स्वाभाविकपणे व निसंकोचपणे स्थानिक जीवनानुभव अपरिहार्यतेतून कथन केले. आधुनिक लघुकथा, पुरातन गोष्टी किंवा कहाणी यांचा जसा जमेल तसा मेळ घालित बहुतांश गोष्टी लिहीत राहिले. कारण त्यांनी जे जग पाहिले, अनुभवले होते, तीच माणसे त्यांच्या सुखदुःखासह ज्या सामाजिक विश्वामध्ये भांडवलप्रधान अर्थव्यवस्थेने डांबून ठेवले होते व अश तळागळातील माणसे घरात विवंचनेत जगत होते, त्यांना समाजापर्यंत पोहचविण्यासाठी लेखणी झिजविली. अशा स्थितीत कोणत्याही पांढरपेशा





लेखकाप्रमाणे पुस्तकाची कपाटे मांडून सुरक्षित निवासाच्या हस्तिदंती हवेलीत राहून ते कविता, कथा, साहित्य लिहीत नव्हते. उलट एका हातात जनजागरणाचा पूर्वापार चालत आलेला शाहिरीचा डफ आणि दुसऱ्या हातात लेखणी घेऊन पूर्वसंचित मनात ठेवून सामाजिक सुधारणेचे धागे उकलत ते आपली निर्मिती करीत होते. इंग्रजी आमदानी संपुष्टात आल्यानंतर स्वतंत्र भारतात बराच काळ त्यांनी साहित्यसेवा दिली होती. अनुवांशिक अनुभवाच्या दारूण मुशीतून त्यांची कथा– साहित्य तयार झाले होते. म्हणूनच त्यांच्या कथालेखनाचे नैतिक मूल्यमापन करताना त्यांच्या जगण्याच्या वाटचालीतील सामाजिक वास्तवाचे भान विसरता येत नाही. याचप्रमाणे शाहिरी, काव्यलेखन तथा कादंबरी लेखनामध्ये नवे आयाम तयार केले. आणि लेखनामधून सुखांत दर्शवून वाचकांमध्ये संघर्षशीलता आणि आशावाद या बाबींचे संस्कार केले.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी** – एका बलाढ्य राजवटीशी महात्मा गांधींजी अहिंसात्मक मार्गांनी लढा देत होते. यास समांतर म्हणता येईल, असा सामाजिक उत्क्रांतीचा लढा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उभारला. त्याद्वारे आंबेडकरांनी याच देशातील जात नाही अशा जातीपातीची निर्मिती करून हजारो वर्षे या देशातील बहिष्कृत जनतेवर लादलेल्या सांस्कृतिक व धार्मिक साम्राज्यशाहीविरुद्ध आपला मूलभूत मानवी हक्काच्या साम्राज्याचा लढा देऊन सामाजिक न्यायाची मागणी केली. म्हणून असा लढाऊ साम्राज्यवाद भारतात निर्माण झाला होता. त्याचे 'जग बदल घालुनी घाव ८ मला सांगून गेले भीमराव' असे बाबासाहेबांच्या विचारांचा वसा घेऊन आणि तो वारसा चालवणारे अण्णा भाऊ होते. मराठी साहित्यात आणि लोककलेत गोंधळ, जागरण इ.नी संदेश देत होते. लेखनातून नीतिमत्तेची शिकवण देत असत.

**नीतीशिक्षणाचे धडे** – नीती हे बुद्धांच्या विचाराचे द्योतक आहे. संपूर्ण विश्वाला नीतीचा संदेश बुद्धांनी दिला. असा वारसा लेखनामधून त्यांनी पुढे चालविला. जगासमोर नीतीशिक्षणाचे धडे दिले. अशाप्रकारे लेखणीला वाहून कादंबरी दृ कथा इ. वाङ्मयप्रकारांमधून विपूल लेखन केले.

**प्रादेशिकतेचे चित्रण** – अण्णांच्या साहित्यामध्ये प्रादेशिकता ठासून भरलेली आहे. हा प्रदेश साहित्याचा प्राण बनून आलेला आहे. तत्कालीन ग्रामीण कथाकारांच्या प्रादेशिक साहित्यिकांच्या पंक्तीत अण्णा भाऊंना बसवणे योग्य आाहे. परंतु अण्णा भाऊंना नावाजलेल्या कथाकारांच्या तांडयामध्ये समाविष्ट केले नाही. उलट वाचकांनी भरभरून प्रतिसाद दिला. महाराष्ट्रात खूप लोकप्रियता लाभली. त्यांचे साहित्य तुफान गाजले. अस्सल ग्रामीण माणसाला त्यांनी विनोदी पध्दतीने साहित्याचा विषय बनविले. ग्रामीण समाजव्यवस्थेतील माणसांना साहित्यामध्ये नगण्य स्थान होते.



DEGLOOR COLLEGE DEGLOOR
Dist. Nanded

ग्रामीण माणूस साहित्याचे भक्कम केंद्र बनू शकतो, याकडे लक्ष वेधले. ग्रामीण माणसांची परंपरागत उपेक्षा संपवून त्याला स्वाभिमानाने कणखरपणे अधोरेखित केल्यामुळे त्यांच्या लेखनकृतींना अमाप लोकप्रियता लाभली.

**शोषक–शोषित अनुबंध –**

गावकुसाच्या बाहेरचे आणि आतले असा साहित्याचा पट उलगडताना लेखकाने ग्रामीण भागातील जमीनदार, श्रीमंत बागायतदार, पाटील, इनामदार ही माणसे म्हणजे शोषकांचे प्रतिनिधी आहेत. परंतु त्यांच्यामध्ये शोषकवृत्तीला अपवाद असतात. ही माणसं गावात बडी समजली जातात. गावात त्यांचीच सत्ता असते आणि संपत्तीही असते. त्यांच्यात सत्तेसाठी संघर्ष चालू असतो. स्वार्थासाठी ते बलुतेदारांना वेठीस धरतात. दुर्बलांना हाताशी धरुन नको असलेल्या सबलांचा किंवा दुर्बलांचा काटा काढण्याचे कसब वापरतात, षड्यंत्र चालवितात. गावातील वतनदार सामान्य माणसांचा किंवा नोकरांचा छळ करतात. अशा बेपर्वाईने वागणा–या वतनदारांना जवळून पाहिल्यामुळे त्यांच्या वृत्ती–प्रवृत्तींचे, नायक–नायिकारूपी चित्रण कादंबरींमधून साकारले. तत्कालीन प्रस्थापित वतनदार, सरंजामदार मंडळींच्या दुष्ट प्रवृत्तीबद्दल ती पात्रे पेटून उठतात. संघर्षासाठी सिद्ध होतात. त्यांनी रेखाटलेल्या नायिका प्रथमदर्शनी हतबल वाटतात, पण उत्तरभागात शील रक्षणार्थ आक्रमक बनतात. स्वरक्षणार्थ सिद्ध होतात. त्यांनी साहित्यामधून अशा कर्तृत्ववान नायिका निर्माण केल्या. त्यांच्या साहित्यातील तडफदार नायक आणि तेजस्वी नायिका खूप साहसी आहेत. लेखकाने त्या मानसकन्याच निर्माण केलेल्या आहेत. सांस्कृतिकदृष्ट्या मागासलेल्या, परावलंबी, अंधश्रद्धेत गुरफटलेल्या, दारिद्र्यांशी झुंज देत कुटुंबावर निरातिशय प्रेम करणा–या आणि परपुरूषाबद्दल निर्भयतेने वागणा–या नायिका अब्रूची टवाळी करणा–यांच्या नरडीचा घोट घेण्यास समर्थ आहेत. बाणेदार आणि धाडसी स्त्री पात्रे आणि अन्यायाविरूद्ध दंड थोपटणारी स्त्री अण्णा भाऊंनी अधोरेखित केली, ही मराठी साहित्यास नवदिशादर्शक बाब आहे.

**थोर लेखकांची विवंचना–** तरीसुद्धा ते आर्थिकविवंचनेत सापडले. त्यामुळे अडचणीने गांजलेल्या अण्णा भाऊंना किरकोळ पैशासाठी प्रकाशकांकडे फेऱ्या माराव्या लागल्या, हे वास्तव लपून राहिले नाही. त्यांच्या आयुष्यात लेखक म्हणून अल्पसे मान–सन्मान वाटयाले आले. परंतु तत्कालीन व्यवस्थेतील प्रस्थापित लेखक – समीक्षकांनी अण्णा भाऊंना लेखक समजलेच नाही. उलट ते समाजवादाचे आणि साम्यवादाचे प्रचारक आहेत, म्हणून हीनवले. म्हणून अण्णा भाऊंच्या हयातीत त्यांचे थोरपण कळलेच नाहीत. त्यांच्या जगण्यामध्ये दैन्य– दारिद्र्याने थैमान घातले





असतानासुद्धा लेखनामधून त्याचा लवलेशसुद्धा मांडलेला नाही, ही बाब कलावंत म्हणून त्यांच्या ठायी ठसठसीत झालेली दिसते.

**विश्वव्यापी कर्तृत्व** – अण्णा भाऊंना साम्यवादी राष्ट्रांमध्ये निमंत्रणे आणि भेटी ही भुषणावह बाब आहे. या प्रतिभासंपन्न माणसांचा वाटेगाव ते रशिया हा प्रवास अफलातून वाटतो. दीड दिवसाच्या औपचारिक शाळेत शिकलेला माणूस सभोवतालच्या माणसांच्या जगाच्या शाळेत अनुभवांच्या बळावर थोर विचारवंत लेखक म्हणून यशस्वी ठरले. धार्मिक, सामाजिक शोषणविरोधी चौकट विस्तार करणे आणि परंपरागत मूल्ये उद्धवस्तीकरणाची सुसंगत मांडणी करणे अतिशय महत्त्वाचे वाटते. त्यांच्या लेखनामध्ये विश्वव्यापी समाजभान, समाजसुधारणेची जाण आणि अस्सल मराठी बाणा प्रत्ययास येतो. मानवतेच्या आदर्शपर आणि वामप्रवृत्तींच्या निषेधपर लेखन विशेष भावते. वास्तव नैतिक मूल्यांचे प्रदर्शन व अनैतिक वर्तन करणारांचे निर्दालन नजरेत भरते.

अण्णा भाऊंच्या साहित्याचे अवलोकन केले असता काही विशेष नोंद करता येतात. ते प्रामुख्याने खालीलप्रमाणे–

१.अण्णाभाऊंच्या साहित्यामधून समाजवादी मूल्यांचा प्रसार आणि साम्यवादी क्रांतीचा उद्‌घोष आढळतो.

२.विश्वव्यापी मानवी मूल्यांचा पुरस्कार व दासप्रथा निर्मूलन विषयक संदेश दिलेला आहे.

३.शोषित समाजातील स्वाभिमानी व्यक्तिचित्रणे, अन्यायाविरुद्ध बंड करून उठणारी पात्रे (बंडखोर नायक – नायिका), देशसेवेसाठी स्वत्व विसरणारे व्यक्तिचित्रणे (चंद्रा), नारी अबला नसून सबला असल्याबाबतची सचेतन मांडणी, नारी क्रांतीसंवेदना, हिंदू–मुस्लीम ऐक्यदर्शक वर्णने (उदा. रुकसाना पूर्वाश्रमीची गीता– अग्निदिव्य), पारंपरिक सलोखा राखण्यासाठी उदरनिर्वाहाचे साधन म्हणून तमाशात काम करणा–या मात्र शील रक्षण करणारी पात्रनिर्मिती हे त्यांच्या साहित्यामधील अतिशय संदेशपूर्ण आहे. प्रतिकूल परिस्थितीत शील रक्षणार्थ मार्ग काढणा–या व्यक्तिरेखा साहित्यामधून जीवंतपणे चित्रित केलेल्या आहेत. साहित्य निर्मितीमध्ये सामाजिक दातृत्वाचे आदर्श व्यक्तिचित्रणातून (फकिरा– कुलकर्णी), साहसी, पराक्रमी, बाणेदार, कणखर स्वभावाची पात्रे, भुकेचा प्रश्न (शरीराची वा वासनेची) घेऊन जगणा–या व्यक्तिरेखा, समता, बंधुता, स्वातंत्र्य या मूल्यांचा उद्‌घोष करणारी पात्रे लेखनामध्ये लक्षवेधी आहेत.

४.शोषितांच्या दुःखाच्या वाचा फोडणारी भाषा, वाचकांना जगण्याचे बळ देणारी प्रेरणा ठासून भरली आहे.

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY DEGLOOR COLLEGE DEGLOOR Dist.Nanded

५.मानवमुक्तीचा उद्घोष करणारे आशयद्रव्य, श्रद्धा–अंधश्रद्धावरील प्रहार करणाऱ्या विचारांची मांडणी, सामाजिक संकेतांना तिलांजली देणारा विचार प्रकट झालेला आहे.

६.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आदर्श मानणारी प्रभावळ आणि विज्ञानवादी मूल्यांची मांडणी, या बाबींमुळे त्यांच्या लेखणीला सामाजिक लढयाचे शस्त्र बनविण्याचे सामर्थ्य हे त्यांच्या लेखनाचे विशेष आहेत.

१. २१ व्या शतकात वाचकांना आणि अभ्यासकंना सक्षमपणे जीवनमूल्ये देणारी वैचारिक शिदोरी अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यामध्ये आहे. वाचकांना उर्जा देणारे आणि सद्यस्थितीत मरगळलेल्या माणसांना आत्मभान देण्याचे तथा नवसंजीवनी प्राप्त करून देण्याचे सामर्थ्य या वाङ्मयीन भांडारामध्ये आहे. त्याचा आस्वाद, आकलन आणि मूल्यमापन कालोघात बदलेल्या मोजपट्टीने व्हायला हवे.

**समारोप** – कला, साहित्य, संस्कृती, शिक्षण, नाट्य, या बहुविध कलांचा संगम साहित्यामधून लीलया पाझरतो. गिरणी कामगारांचे प्रश्न, भांडवलदारांच्या विरोधात जनजागृती यांची लेखनामधील वर्णने वास्तवाच्या अधिक जवळ पोहचतात. स्त्री–पुरूष समानता, सामाजिक दृ जातीय समता तथा आर्थिक समतेची मूल्ये अण्णा भाऊंच्या लेखनाचा मूळ गाभाच आहेत. सामाजिक मागासलेपणाच्या वेष्टनामधून बाहेर पडून साम्यवादी क्रांतीची कास धरणारा माणूस त्यांच्या लेखनाच्या केंद्रस्थानी आहे. दलितत्वामधून बाहेर पडून क्रांतीप्रवण बनलेला मानव हाच डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीचे केंद्र होता. अण्णाभाऊंनी याच क्रांतिकारक विचारांचा स्वीकार केला आणि समतेचे मूल्यभान जपणारी साहित्यधारा प्रवाहित केली. ती मराठी साहित्याच्या दृष्टीने अतिशय मोलाची आहे.

**संदर्भग्रंथ आणि संदर्भ साधने –**


१. अण्णा भाऊ साठे समग्र वाङ्मय
२. जननायक अण्णाभाऊसाठे – संपा. प्रा डॉ शिवाजीराव जवळगेकर
३. विद्रोही कलावंत अण्णा भाऊ साठे – प्रा डॉ राजेश्वा दुडुकनाळे
४. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील स्त्रीजीवन – एक अभ्यास (प्रबंध) - प्रा डॉ राजू बडुरे
५. अण्णा भाऊ साठे व समाल परिवर्तन – प्रा विठ्ठल भंडारे
६. अण्णा भाऊ साठे जीवनदर्शन – वानखेडे चंद्रकांत
७. साहित्त्न अण्णा भाऊ साठे (स्मरणिका)– वाव्हुळकर एस के
८. विकिपिडिया – (संकेतस्थळावरील माहिती)


❑❑❑

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded